दै. लोकमत दि. 04/12/2023

## आरोपीस मुद्देमालासह अटक...



लोहा तालुक्यातील माळाकोळी येथील दरोडा प्रकरणातील आरोपी निष्पन्न झाले असून दोघा आरोपींपैकी एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १ लाख ४४ हजाराच्या मुद्देमालासह अटक केले. अटकेतील आरोपी व जप्त मुद्देमालासह पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने यांच्यासह कर्मचारी.

प्रजावाणी

# लांडगेवाडी खून व दरोडा प्रकरणी भावांना अटक



नांदेड, दि. ३ : माळाकोळी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लांडगेवाडी शिवारातील एका आखाड्यावर वयोवृद्ध जोडप्यास मारहाण करून अंगावरील सोन्या-चांदीचे दागिने लुटल्याची घटना गेल्या महिन्यात घडल्यानंतर दरोडेखोराच्या मारहाणीत जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला होता. या खुनाच्या घटनेतील दोन जणांना 'एलसीबी'च्या पथकाने पकडून पुढील तपासासाठी माळाकोळी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दोन्ही आरोपी हे भाऊ असून, त्यांच्यावर परभणी, बीड, हिंगोली जिल्ह्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

▮ पान २ वर